<u>तातडीचे</u>

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
नागरी सुविधा केंद्र
जा.क्र.नासुके/२/कावि/ ९२ /२०१४
दि. २४/१२/२०१४

**विषय:- दाखले / परवाने व रिजेक्शन्स वेळेत पाठविणेबाबत...**

**<u>परिपत्रक</u>**

खाजगी तत्वावर देण्यात आलेल्या नागरी सुविधा केंद्रामार्फत प्राप्त झालेले नागरीकांचे अर्ज संबंधित विभागांकडे कार्यवाहीसाठी पाठविण्यात येतात. त्यावर योग्य कार्यवाही झालेले दाखले / परवाने व रिजेक्शन्स नागरी सुविधा केंद्र विभागाकडे विहीत मुदतीत पाठविणेबाबत वेळोवेळी सूचना देण्यात आलेल्या आहेत.

तथापि, काही विभागांकडून पूर्तता झालेले दाखले / परवाने व रिजेक्शन्स दररोज सायं. ४:०० वाजेपर्यंत येणे अपेक्षित असतानादेखील ब-याच वेळेस त्यानंतर येत असल्याचे निदर्शनास येत आहे. तसेच काही विभागांकडून अर्ज सिस्टीमव्दारे आऊट केले जात नाहीत आणि टोकन क्रमांक चुकीचे टाकलेले असतात. परिणामी ते परत पाठवावे लागतात. त्यामुळे दाखले / परवाने व रिजेक्शन्स नारिकांना मिळण्यास विलंब होतो.

नागरी सुविधा केंद्राची संपूर्ण कार्यप्रणाली सर्व संबंधित विभागांना माहित असूनदेखील विभागाकडून दाखले / परवाने व रिजेक्शन्स घेऊन येणा-या शिपाई कर्मचा-यासोबत संबंधित नागरीकही येतात व दाखले / परवाने व रिजेक्शन्स समक्ष नेण्यास आग्रह धरतात. प्रत्यक्षात नागरी सुविधा केंद्राच्या कार्यप्रणाली नुसार दाखले / परवाने व रिजेक्शन्स हे खाजगी तत्वावर देण्यात आलेल्या नागरी सुविधा केंद्रामार्फतच दिले जातात. तरी सर्व शाखा प्रमुखांनी आपल्या विभागाकडील पूर्तता झालेले सर्व दाखले / परवाने व रिजेक्शन्स एकाच वेळी नागरी सुविधा केंद्र विभागाकडे दररोज सायं.४:०० वाजेपर्यंत पाठविण्याची आणि शिपाई कर्मचा-यासोबत संबंधित नागरीक पाठवू नये अशी स्पष्ट समज संबंधितांना देण्यात यावी.

**सहाय्यक आयुक्त,ना.सु.कें**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी – ४११ ०१८.

प्रति

सर्व संबंधित विभागप्रमुख / शाखाप्रमुख

विभाग